# Govt. Of Maharashtra

No.Rocog-2013/(59/13)Mah Edu-1
School Education & Sports Depart
Madam Cama Road, Hutatma Rajguru chowk, Extension Bldg.,
Mantralay, Mumbai – 32

Dated 27 May 2013

To,

Chairman/ Secretary,
Sonashankar Dnyanvikas Trust,
Sonashankar Nivas, Barshi Road,
Bale, Tal. N. Solapur, Dist. Solapur

Subject :- Regarding grant of permission to permanently non-grantable English Medium School affiliated to CBSE Board Syllabus, for the Academic year 2013-2014

Nagesh Karajgi Orchid School, Solapur managed by Sonashankar Dnyanvikas Trust, Solapur

Reference :- 1) School Education and Sports, departments Govt. resolution No. Noc-2009/(663/09) Mah. Edu. -1
2) Govt. Letter No. Hetup-2012/(144/12)/Mah. Edu. -1 dtd.19/12/2012 Letter of Intent.
3) Dy. Director Education, Pune Division Pune Letter dtd. 12/03/2013.

As per Govt. resolution referred in Sr. No. 1 all the terms and conditions are mentioned regarding the grant of Letter of Intent, permission, recognition and NOC to all permanently non grantable English Medium Schools who wish to start CBSE, ICSE/IGCSE/CIE Board syllabus and who have made application to the Govt. It is binding on all Schools to comply all conditions mentioned therein before starting the School.

With reference to the captioned subject and letter of reference Sr. No. 3 you are hereby granted permission under following terms and conditions to start English Medium School from standard 1 to 12 on permanently non grantable basis with

affiliation to CBSE Board at 125/2 Juni Mill Compound, Murarji Peth, Solapur.

1. No grants would be applicable to this School in future.
2. Your School should strictly comply all Govt. rules and regulations orders, secondary School Code, Maharashtra Private School staff (service conditions) rules 1981.
3. It is necessary that the society should be financially sound.
4. The society should provide adequate and sufficient building for the School.
5. Society should make provision for separate play ground for the School.
6. The society should appoint a person as a head master to the School as per rule No. 3(1)(B) of Maharashtra Private School service conditions.
7. The society should appoint sufficient qualified teachers in the School.
8. The society should follow seniority list while appointing teaching and non teaching staff to the School.
9. Society should make provisions for fully equipped laboratory for the School.
10. Society should make provisions for independent library.
11. Society should make provision for sufficient furniture, sports items and other educational materials as per the strength of the standards in the School.
12. Society should establish a computer lab in the School.
13. Separate hygienic wash room facilities to be provided for both boys and girls.
14. It is mandatory to comply all terms and conditions of right to free and compulsory Education Rules 2009.
15. If it comes to the notice that any of the terms and conditions mentioned herein are violated by the School

then recognition of the School shall be cancelled or withdrawn as per sec. 12 of Maharashtra Right to Free and Compulsory Education of Children.

16. The Society shall start the School within 18 months from the grant of permission from the Government.

17. If the society fails to start the School after obtaining permission within 18 months on the given premises then the permission stands automatically cancelled.

18. On complying all the terms and conditions as per sec. 18 of rule 2009 and sec. 11 of 2011 of right to free and compulsory educations, it is necessary for the School to obtain recognition from District Education Officer (Primary/Secondary) Solapur.

19. On obtaining recognition from District Education Officer (Primary/Secondary) Solapur the Society shall make an application for the grant of NOC to the Govt. for the affiliation to the concerned Board.

(S. N. Joshi)
Addl. Secretary
Govt. of Maharashtra

Copy to :

Director of Education (Primary/Secondary/Higher Secondary), Maharashtra State, Pune.

Divisional Education Deputy Directorate, Pune Division, Pune.

Education Officer (Primary/Secondary) Zilla Parishad, Solapur

Selection Committee, Maharashtra Education-1, School Education & Sports Dept. Mantralaya, Mumbai – 32.

Mukund M. Kulkarni
(Advocate)

## Affidavit

## Before the Hon'ble Public Notary Solapur,

I Mukund Madhavrao Kulkarni, age : 50 years, Occu. : Advocate, R/o. Solapur do hereby state on solemn affirmation as under :

1) That I am the resident of Solapur, practicing as a lawyer.

2) I know Marathi and English very well. I can read and write both the languages. I can translate from Marathi into English vise versa. I have translated the above document from Marathi into English.

The above contents are true and correct to the best of my knowledge and belief and in token of which I have signed this affidavit today at Solapur.

Place : Solapur
Date : 01/3/2014

Affient

Solemnly affirmed before me by
Shri Mukund Madhavrao Kulkarni
Who is identified by Shri ..........
Whom I personally know
Date :- 01 / 03 /2014

01/03/2014
Subhash Nagnath Bel
Notary Govt. of India
Solapur.
(Maharashtra State)
1 MAR 2014

NOTARY
Subhash N. Bel
Notary Govt. of India
Solapur
(Maharashtra State)
Reg. No. 3043
GOVT. OF INDIA

Noted and Registered at
Serial No 6929/14
Date 1 MAR 2014

Notarial Stamps CANCELLED
Notarial Stamps CANCELLED
Notarial Stamps CANCELLED
NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

**महाराष्ट्र शासन**

क्रमांक:मान्यता-२०१३/(५९/१३)/माशि-१
शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२.
दिनांक : २७ मे, २०१३

**प्रति,**
**अध्यक्ष / सचिव,**
सोनाशंकर ज्ञानविकास ट्रस्ट, -
सोनाशंकर निवास, बार्शी रोड,
बाळे, ता. उत्तर सोलापूर,
जि. सोलापूर ४१३ २५५.

विषय :-सन २०१३-१४ या शैक्षणिक वर्षात सी.बी.एस.ई. या अभ्यासक्रमाशी संलग्नित होऊ इच्छिणा-या कायम विनाअनुदानित तत्त्वावर इंग्रजी शाळांना परवानगी देणेबाबत....
**सोनाशंकर ज्ञानविकास ट्रस्ट, सोनाशंकर निवास, बार्शी रोड, बाळे, ता. उत्तर सोलापूर, जि. सोलापूर ४१३ २५५ द्वारा संचालित नागेश करजगी ऑर्किड स्कूल, सोलापूर**

संदर्भ :- १) शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभाग क्र.नाहप्र-२००९/(६६३/०९)/माशि-१, दिनांक २०.०६.२०१२.
२) शासन पत्र क्रमांक हेतूप - २०१२ / (१४४/१२) / माशि - १ दिनांक १९/१२/२०१२ चे हेतूपत्र.
३) शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे दिनांक १२/०३/२०१३ चे पत्र.

संदर्भ क्रमांक १ अन्वये राज्यात सी.बी.एस.ई. / आय.सी.एस.ई./ आय.जी.सी.एस.ई./ सी.आय.ई. या अभ्यासक्रमाशी संलग्नित होऊ इच्छिणा-या कायम विनाअनुदानित तत्त्वावर इंग्रजी माध्यमांच्या शाळा सुरु करण्याकरीता राज्य शासनाकडे अर्ज केल्या नंतर सदर शाळांना हेतूपत्र (Letter Of Intent), परवानगी (Permission), मान्यता (Recognition) व ना हरकत प्रमाणपत्र (N.O.C.) देण्याबाबतची सविस्तर कार्यपध्दती विहित करण्यात आली आहे. त्याप्रमाणे शाळा सुरु करण्यापूर्वी विहित केलेल्या कार्यपध्दतीची पुर्तता करणे बंधणकारक राहणार आहे.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने संदर्भाधिन क्रमांक ३ अन्वये प्राप्त झालेल्या पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, आपल्या अर्जात नमूद केलेल्या **१२५/२, जुनी मिल कंपाऊंड, मुरारजी पेठ, सोलापूर** या ठिकाणी सी.बी.एस.ई. या अभ्यासक्रमाशी संलग्नित होऊ इच्छिणा-या **इयत्ता १ ते १२ वी** पर्यंतच्या कायम विनाअनुदानित तत्त्वावर इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करण्यासाठी माध्यमिक शाळा संहितेनुसार आवश्यक असणा-या सर्व बाबींची तसेच खालील अटी व शर्तीची पूर्तता करण्याच्या अधिन राहून शासन **परवानगी** देत आहे.

१) सदर शाळेला भविष्यात कोणतेही अनुदान अनुज्ञेय राहणार नाही.

२) सदर शाळेस शासनाच्या वेळोवेळी निघणा-या आदेशांचे, माध्यमिक शाळा संहिता, महाराष्ट्र खाजगी शाळांतील कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियमावली १९८१ चे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक राहील.

३) सदर संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारण असणे आवश्यक आहे.

४) संस्थेने सदर शाळेला शैक्षणिक दृष्टया योग्य व पुरेशी इमारत उपलब्ध करुन द्यावी.

५) संस्थेने सदर शाळेसाठी स्वतंत्र क्रिडांगणाची सोय उपलब्ध करुन द्यावी.

६) संस्थेने सदर शाळेत मुख्याध्यापक पदी महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवा शर्ती) नियमावली १९८१ मधील नियम क्र.३(१) (ब) नुसार पात्र व्यक्तिंची नियुक्ती करावी.

७) संस्थेने सदर शाळेत पुरेसा प्रशिक्षित शिक्षक वर्ग नियुक्त करावा.

८) संस्थेने सदर शाळेत शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचा-यांच्या नियुक्त्या करताना बिंदु नामावलीनुसार करण्यात याव्यात.

९) संस्थेने सदर शाळेत सर्व साहित्यानिशी स्वतंत्र प्रयोगशाळा उपलब्ध करुन द्यावी.

१०) संस्थेने सदर शाळेत स्वतंत्र ग्रंथालयाची सोय उपलब्ध करुन द्यावी.

११) संस्थेने सदर शाळेत विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात पुरेसे फर्निचर, क्रिडा साहित्य, कार्यानुभव साहित्य व इतर शैक्षणिक साहित्य उपलब्ध करुन द्यावे.

१२) संस्थेने शाळेत अद्ययावत संगणक प्रयोगशाळा निर्माण करावी.

१३) मुला-मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छता गृहाची सोय असावी.

१४) संस्थेने बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ मधील सर्व अटी व शर्तीची पूर्तता करणे आवश्यक राहील.

१५) शाळेस परवानगी व मान्यता देण्यासाठी विहित केलेल्या अटी व शर्तींचे पालन करण्याचे शाळेने थांबिवले आहे असे निदर्शनास आल्यास शाळेची मान्यता महारष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार नियम १२ नुसार काढून घेण्यात येईल

१६) शाळेस शासनाकडून परवानगी दिल्यानंतर संस्था जास्तीत जास्त १८ महिन्याच्या आत परवानगी दिलेल्या ठिकाणी शाळा सुरु करेल.

१७) शासनाने संस्थेस ज्या ठिकाणी शाळा सुरु करण्यास परवानगी दिली आहे. त्याठिकाणी १८ महिन्याच्या आत शाळा सुरु न केल्यास दिलेली परवानगी आपोआप रद्द होईल.

१८) शाळा बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९ मधील कलम १८ च्या अनुषंगाने नियम २०११ मधील नियम ११ मध्ये विहित केलेल्या अटी व शर्ती पूर्ण केल्यावर **जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), सोलापूर** यांचेकडून शाळेला मान्यता घेणे आवश्यक राहील.

१९) **जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), सोलापूर** यांनी शाळेस मान्यता दिल्यावर संस्था संबंधित मंडळाच्या संलग्नतेसाठी ना हरकत प्रमाणपत्रासाठी शासनाकडे अर्ज करेल.

सु. न. जोशी.

**(सु.न.जोशी)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

शिक्षण संचालक (प्राथमिक / माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे
शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक) जिल्हा परिषद, सोलापूर.
निवड नस्ती, माशि-१, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२.